मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# नेहम्याची विशाल भिंत

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Jonathan Hay
रूपान्तरकार: Mary-Anne S.
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2015 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

पर्शिया, या सामर्थ्यशाली राष्ट्राने, जगावर राज्य केले. अर्तहशश्त राजा पर्शियावर राज्य करित होता. यामुळे तो जगातील सार्वात जास्त सामर्थ्यशाली राज्यकर्ता बनला. राजाचे जे मदतनिस होते त्यांच्यापैकी एक यहुदी पुरुष; नहेम्या हा एक महत्वाचा मदतनिस होता. राजाला कोणत्याही प्रकारची विषबाधा होऊ नये यासाठी राजाच्या भोजनाची चव घेणे हे त्याचे काम होते.



एके दिवशी नेहम्या दुःखी चेहऱ्याने राजा समोर आला. काय चुकीचे घडले आहे, हे राजाला जाणून घेण्याची इच्छा होती. नहेम्याने राजाला म्हटले, "महाराज चिरायु होवोत; माझ्या वाडवडीलांच्या कबरा आहेत ते नगर उजाड पडले आहे, त्याच्या वेशी अग्नीने जळून गेल्या आहेत, म्हणून माझे तोंड उतरले आहे." पुष्कळ वर्षांपुर्वी युध्द्‌ात उध्वस्त झालेल्या यरुशलेम शहाराविषयी नहेम्या बोलत होता.



अर्तहशश्त राजाने विचारले, "तुझी विनंती काय आहे?" तेव्हा नहेम्याने म्हटले, "मला यरुशलेमेला पाठवा म्हणजे त्याची मी पुनर्बांधणी करीन." आस्थेवाईकपणे राजाने त्याची मागणी मान्य केली. तसेच नहेम्याचे प्रवासादरम्यान संरक्षण व्हावे म्हणून राजाने त्याला औपचारिक पत्र देखिल दिले.



राजाने यापेक्षा अधिक मदत केली. राजाने जंगलाचा अधिपति आसाफ याला देखिल पत्र दिले. शहाराची भिंत उभी करण्यासाठी जितके लाकडे लागतील तितके लाकडे देण्याचा आदेश या पत्रात राजाने आसाफला दिले होते.



नहेम्या जेंव्हा यरुशलेमेत येऊन पोचला तेंव्हा त्यांने शहराच्या पुढाऱ्यांना गोळा करुन म्हटले, "आपण येथे दुर्दशेत आहोत. शहर उजाड झाले आहे आणि वेशी अग्नीने जळून गेल्या आहेत. तर चला आपण पुनर्बांधणीच्या कामी लागू या." त्याने त्यांना सांगितले की राजाने या कामी त्याला मान्यता दिली आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे परमेश्वर त्यांच्या बाजूने होता.



नहेम्याच्या विश्वासाने आणि उत्साहाने लोकांना प्रेरणा मिळाली असेल. "चला आपण बांधण्याच्या कामास लागू." असे म्हणत त्यांनी नहेम्याला संम्मती दर्शाविली. प्रत्येक कुटूंबाने कोटाचा कोणता भाग बांधावा हे नहेम्याने त्यांना सांगितले.



परंतू, भिंतीची पुनर्उभारणी करण्यास सर्वच जण सहमत होते असे नाही. एक मनुष्य ज्याचे नाव सनबल्लट असे होते आणि त्याचे दोन मित्र तोबीया आणि गेशाम हे यहुदी नव्हते, यांना कोटाची भिंत बांधली जावी आणि वेशी उभ्या केल्या जाव्यात असे वाटत नव्हते.



काम पुढे चालूच राहिले, तेंव्हा सनबल्लटाला फार राग आला. तो आणि त्याचे मित्र यहुदी लोकांचा उपहास करु लागले. तोबीया म्हणाला, "ते जी दुबळी भिंत बांधत आहे ती बांधून झाल्यावर तिच्यावर एखादा कोल्हा चढला तरी तो त्यांचा कोट पाडून टाकील." नहेम्याने त्यांना उत्तर दिले नाही. त्याऐवजी देवाने त्यांना पाहून घ्यावे अशी त्याने प्रार्थना केली.



जेंव्हा त्यांच्या उपहास करण्याने काही फरक पडत नाही असे त्यांना कळून आले, तेंव्हा त्यांनी यरुशलेमविरुध्द् लढून त्यांना जितका त्रास देता येईल तितका त्रास देण्याचे कपट कारस्थान केले. पुन्हा नहेम्याने देवाकडे मदतीची प्रार्थना केली. तसेच बांधकाम करतांना काही अकस्मात घडू नये म्हणून दिवसा व रात्री पहारेकरी नेमले.



यहुदी लोक खुप परिश्रम करत होते, ते थकत चालले होते. ते काम करत असतांना शत्रू येऊन त्यांना मारुन टाकतील की काय अशी भिती काहींना वाटत होती. तरी देखिल, नहेम्याने, काम थांबविले नाही. त्याने काम करणाऱ्यांभोवती पहारेकरी नेमले, आणि त्यांच्या शत्रूंपेक्षा त्यांचा परमेश्वर अधिक सामर्थ्यशाली आहे याची त्यांना आठवण करुन दिली.



नहेम्या आदर्श जिवन जगण्याचा प्रयत्न करित होता.

अर्तहशश्त राजाने नहेम्याला यरुशलेमचा प्रांताधिकारी बनविले होते यामुळे त्याला लोकांकडून अन्न आणि पैसा मागण्याचा अधिकार होता, परंतू त्याने तसे केले नाही. कोटाचे बांधकाम करणाऱ्या लोकांसंगती राहून तो काम करित राहिला. अन्न विकत घेण्यासाठी त्याने स्वतःचा पैसा खर्च केला.





अखेरिस, लोकांनी कोटाच्या भिंतीचे बांधकाम पूर्ण केले, आणि आता केवळ कवाडे म्हणजे कोटाची प्रमुख दारे बसविण्याचे काम बाकी होते. जेंव्हा सनबल्लट, तोबीया आणि गेशेम यांनी ऐकले की सर्व खिंडारे बुजवून कोट बांधून पुर्ण झाला आहे, तेंव्हा नहेम्याला इजा पोचविण्याची त्यांनी योजना आखली.



त्यांनी नहेम्याला ओनो नावाच्या ठिकाणी भेटण्यासाठी एक संदेश पाठविला. परंतू ते त्याला काही इजा करता यावी यासाठी फसवून शहराच्या बाहेर बोलवत आहे, हे नेहम्याने ओळखले. नहम्याने त्यांना उत्तर पाठविले की, काम सोडून तो त्यांच्याकडे भेटण्यास येऊ शकत नाही.



अखेरिस भिंतीचे
काम पुर्ण झाले,



आणि तिचे संरक्षण करण्यास
नहेम्याने पहारेकरी नेमले.



सुर्य उगवून उन
येईपर्यंत वेशी उघडू
नये आणि संपूर्ण रात्रभर
वेशीचे

दरवाजे लावून
त्यास अडसर घालावे असा
नहेम्याने नियम लावून दिला.

आता शहर सुरक्षित होते, पुष्कळ यहुदी जे जगातील वेगवेगळ्या ठिकाणी परागंदा झाले होते ते यरुशलेमेत परतले. सर्व प्रकारच्या अडथळ्यांत देखिल देवाने दिलेले काम पुर्ण केल्याबद्द नहेम्याला फारच आनंद झाला असेल. तो यरुशलेमांत राहिला आणि सदैव देवाच्या आज्ञा पाळण्यास तो लोकांना मदत करीत असे.



नेहम्याची विशाल भिंत

परमेश्वराची वाणी – बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

नहेम्या

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16